अत्यंत महत्त्वाचे

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८, लेखा विभाग

क्र.लेखा/०६/कावि/३२४/२०१९

दिनांक :- १८/१२/२०१९

विषय:- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या दायीत्वाच्या माहितीबाबत.

परिपत्रक,

महानगरपालिकेच्या वित्त विभागास मनपाच्या दायीत्वाची अद्यावत माहिती उपलब्ध असणे अत्यंग महत्त्वाचे असते. दायीत्वाची अचूक माहिती उपलब्ध असल्यास वित्त विभागास आर्थिक नियोजन करणे सोईचे होते. मनपाच्या भांडवली कामांच्या बिलांच्या अदायगीचे सर्व कामकाज डॅशबोर्ड संगणक प्रणालीव्दारे कार्यान्वीत केले जाते. परंतु मनपाच्या भांडवली कामांच्या विभागातील कर्मचा-यांकडून ( उदा: स्थापत्य, पाणीपुरवठा, विद्युत, इत्यादी) डॅशबोर्ड प्रणालीमध्ये अंदाजपत्रकातील कामाची नोंद व कामांच्या निर्गत आदेशाची नोंद विलंबाने घेतली जात असल्याने अचूक दायीत्वाची माहिती उपलब्ध होत नाही. डॅशबोर्ड प्रणालीमध्ये कामाचा आदेश तयार करण्याची तरतूद करणेत आलेली आहे. त्यानुसार सर्व संबंधीत विभागांनी डॅशबोर्ड प्रणालीमधून कामाचा आदेश निर्गत केल्यास मनपाच्या दायीत्वाची अचूक माहिती व खर्चासंबंधीत इतर माहिती उपलब्ध होऊ शकेल.

सबब, दायीत्वाची माहिती सुलभपणे उपलब्ध होण्याकरीता सर्व संबंधीत कर्मचारी यांना भांडवली कामांचे आदेश ऑफलाईन न करता ऑनलाईन डॅशबोर्ड संगणक प्रणालीमधूनच निर्गत करणेकामी सुचना देणेत येत आहे. सदर परिपत्रकाची नोंद सर्व विभागांनी घेण्यात यावी व सर्व संबंधीत कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८

प्रति,
सर्व संबंधीत विभाग